# वार्षीक अहवाल
# (2018-2019)

**1) गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत तलावातील गाळ काढणे :-**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत धरणातील (तलावातील) गाळ काढणे कार्यक्रम अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने तथा विकासगंगा समाजसेवी संस्था, घाटंजी जि.यवतमाळ आणि केअरिंग फ्रेन्डस् मुंबई यांचे सहकार्याने गडचिरोली गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील मौजा-थोटेबोडी ग्रामपंचायत कोरेगाव येथील मा.मा. तलाव खसरा क्र. 3 या तलावातील गाळ उपसा उद्‌घाटनीय कार्यक्रम पार पडला.






सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. एन.एस. कंगाले ग्रा.पं. सदस्य थोटेबोडी, प्रमुख पाहुणे मा. डी.जे.मसराम, कृषी सहाय्यक, मा. आर.एम.कवडो, तलाठी पिसेवडधा, मा. सौ. विमल कुमरे ग्रा.पं.सदस्या थोटेबोडी, मा. मधुकर टेंभुर्णे, मा. प्रमोदजी लाडे, मा. जी.टी. सहारे कोतवाल थोटेबोडी, मा. अकिल शेख सचिव, अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, मा. जगदिश ढोलणे सदस्य, अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, दिगांबर सुरणकर संस्थेचे कार्यकर्ते यांनी दिनांक 30/5/2018 ते 24/6/2018 पर्यंत मौजा थोटेबोडी येथील 10 शेतकऱ्यांच्या शेतात 8.75 एकर जागेवर तलावातील उपसलेला गाळ जेसीबीच्या माध्यमातून काढून ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतामध्ये पसरविण्यात आला त्यामुळे तलावाचे खोलीकरण होऊन तलावामध्ये पाणी संचय वाढले परिणामी सदर गावाला सदर उपक्रमामुळे फायदा झाला.

**2) शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम :-**

अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली तथा शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांचे वतीने दिनांक 22.06.2018 ला ग्रामपंचायत सभागृह नवरगाव (कुनघाडा) ता. चामोर्शी जि. गडचिरोली येथे शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. संदिप शेंडे उपसरंपच ग्रा.पं. नवरगांव, मा. कपिल दुर्गे पोलीस पाटील नवरगाव, मा. युनूस खान प्रमुख मार्गदर्शक तथा शेती तज्ञ बुलढाणा, मा. सोहम नरवाडे सदस्य शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे, मा. के. जी. भैसारे कृषि सहाय्यक कुनघाडा, मा. अकिल शेख सचिव, अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे उपस्थितीत पार पडला. मा. युनुस खान यांनी विषमुक्त शेती याबद्दल तसेच नैसर्गिक किटकनाशके कशी तयार करायची, विषमुक्त शेतीचे फायदे, रासायनिक खताचे तोटे आणि किटकनाशकांची फवारणी करतांना घ्यावयाची काळजी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. नवरगाव परिसरातील 10 शेतकऱ्यांना मोफत किटकनाशके फवारण्याची किट वाटप करण्यात आली. तसेच त्यांना प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. सदर कार्यक्रमाला नवरगाव, गिलगाव, कुथेगाव, बांधोना, काशिपूर येथील शेतकरी व महिला बचत गटाच्या सदस्या उपस्थित होत्या. सदर उपक्रमाचा लाभ परिसरातील 100 ते 150 शेतकऱ्यांना झाला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. सागर मेश्राम, लोमेश मेश्राम, शिवानी मेश्राम आणि संस्थेचे कार्यकर्ते भास्कर गावडे यांनी परिश्रम घेतले.






3) शिवांष खताचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी प्रकल्प :-

अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली तथा आर्ट संस्था पांढरकवडा जि. यवतमाळ आणि केअरिंग फ्रेन्डस मुंबई यांच्या मार्गदर्शनात गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील वैरागड आणि जोगिसाखरा परिसरातील 15 गावांमध्ये शेतकरी बांधवांना सेंद्रिय पध्दतीने शिवांष खताचे महत्व पटवून देण्याकरीता तसेच शेतकऱ्यांना शिवांष खताची निर्मिती करण्याकरीता शिवांष खत प्रकल्प राबविण्यात आला. शिवांष खत तयार करण्यासाठी टाकाऊ पदार्थांचा वापर केला जातो त्यामध्ये ओला कचरा, सुका कचरा, शेण आणि प्लॉस्टिक फारीचा वापर करण्यात येतो. शिवांष खत हे 18 दिवसांमध्ये तयार होते. शिवांष खतामुळे सिंचनासाठी कमीत कमी पाण्याची गरज पडते. रासायनीक किटकनाशकांचा कमीत कमी वापर होतो. शेतात तणाचे प्रमाण कमी होते. शेतातील जमिनीचे पोषक घटक वाढल्याने उत्पन्नात वाढ होते व रोगाचे प्रमाण कमी होते.

संस्थेच्या माध्यमातून 15 गावातील जवळपास 50 शेतकऱ्यांनी शिवांष खत तयार करुन त्याचा वापर आपल्या शेतामध्ये केलेला आहे. सदर प्रकल्पाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी आर्ट संस्थेचे संचालक सुहास धस, मनसुरभाई, कार्यक्रम समन्वयक सचिन माटे, सतिश खंडागळे, शिवांष मित्र ऋषी सहारे, दिगांबर सुरनकर, दिनेश लांजेवार यांनी परिश्रम घेऊन सदर प्रकल्प राबविला. त्याचा फायदा 15 गावातील 55 ते 60 शेतकऱ्यांना झाला.





4) ईईटी (इंग्लीश ई टेक) प्रकल्प :-

बॉम्बे कॉम्युनिटी पब्लीक ट्रस्ट मुंबई यांचे सहकार्याने तथा अपेक्षा होमीओ सोसायटी मोझरी जि. अमरावती यांचे मार्गदर्शनात आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील धानोरा, दुधमाळा, रांगी, मोहली केंद्रातील 30 जिल्हा परिषद शाळेमध्ये ईईटी प्रकल्प जानेवारी 2018 पासून राबविण्यात येत आहे. BCPT च्या माध्यमातून वर्ग 1 ते 5 वी च्या इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना इंग्रजी विषयाचे अध्यापन करण्यासाठी वर्ग 1 ते 5 वी चा इंग्रजीचा अभ्यासक्रम ॲनिमेटेड माध्यमातून तयार करुन शिक्षकांना पेनड्राईव्ह मध्ये मोफत पुरविण्यात येत आहे.






सदर उपक्रमामुळे इंग्रजी विषयाचे अध्यापन सुलभतेने होत असल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली, इंग्रजी विषयाची भिती नाहीशी होऊ लागली. सदर उपक्रमामध्ये सहकार्य केलेल्या (1) एम.बी.दडमल, (2) पी.जी.पुडो, (3) वाय.डब्ल्यु. वाढई या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचा शिक्षक सन्मान देऊन दिनांक 12/01/2019 ला किलबील सेंटर मोझरी येथे गौरव करण्यात आला. सदर उपक्रमामुळे 30 जिल्हा परिषद शाळेतील 1187 विद्यार्थ्यांना आणि 70 जिल्हा परिषद शाळेतील इंग्रजी विषयाच्या शिक्षकांना लाभ मिळत आहे. सदर उपक्रमासाठी चाईल्ड राईट अलॉयन्सचे अध्यक्ष डॉ. मधुकर गुमळे, सचिव डॉ. सतीश गोगुलवार, संस्थेचे सचिव अकिल शेख आणि स्कुल फॅशिलीटेटर अभिषेक मुत्येलवार प्रयत्न करीत आहेत.

5) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्याबाबत जनजागृती :-

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील मार्कंडादेव येथील महाशिवरात्री यात्रेनिमित्य दिनांक 08.03.2019 ला यात्रेतील भाविकांकरीता आरोग्य विषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भाविकाना आरोग्याच्या विविध योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, स्वाईन फ्ल्यु, मुलगी वाचवा तसेच हेल्प लाईन क्रमांक 102, 104 आणि 108 बाबत माहिती देण्यात आली. तसेच विविध प्रकारचे आजार, माता बालकांचे आरोग्य, संस्थात्मक प्रसुती, प्रसवपूर्व गर्भलिंग निदान, पुरुष शस्त्रक्रिया याबाबत कलापथकाच्या माध्यमातून जागृती करण्यात आली. त्याकरीता मा. डॉ. बेंडले तालुका आरोग्य अधिकारी चामोर्शी तसेच आरोग्य विभागाचे विविध अधिकारी आणि कर्मचारी, संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या मार्गदर्शनात कलापथक प्रमुख गणपत मोहुर्ले यांनी कार्यक्रम सादर केले.

सदर कार्यक्रमाचा लाभ यात्रेतील हजारो भाविकांना झाला.





## 6) पेसा कायदा 1996 बाबत जनजागृती कार्यक्रम :-

जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या माध्यमातून तसेच पंचायत समिती कुरखेडा, आरमोरी, अहेरी, चामोर्शी यांच्या सहकार्याने आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील 44 पेसा ग्रामपंचायतीमध्ये, आरमोरी तालुक्यातील 17 पेसा ग्रामपंचायतीमध्ये, अहेरी तालुक्यातील 38 पेसा ग्रामपंचायतीमध्ये, चामोर्शी तालुक्यातील 32 पेसा ग्रामपंचायतीमध्ये राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियाना अंतर्गत कलापथकाच्या माध्यमातून पेसा कायदा 1996 बाबत जनजागृती करण्यात आली. त्याकरीता मा. राजकुमार पारधी विस्तार अधिकारी, मा. रायपुरे विस्तार अधिकारी, मा. भोगे विस्तार अधिकारी, मा. ठाकुर, मा. कोठारे, मा. सुकारे, कु. म्हशाखेत्री तालुका पेसा समन्वयक यांनी तसेच सुधाकर भोयर, मंगल म्हशाखेत्री, गणपत मोहुर्ले यांच्या कलापथक संचाने संस्थेचे सचिव यांच्या मार्गदर्शनात कलापथक सादर केले.





## 7) एकल महिलांचे सर्व्हेक्षण :-

अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील कुनघाडा परिसरातील नवरगाव, गिलगाव, कुथेगाव, मालेरमाल, मालेरचक, बांधोना, काशिपूर, चित्तेकन्हार, भेंडीकन्हार येथील एकल महिलांचे (विधवा, परितक्ता, घटस्फोटीत, लग्न न झालेले) सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यामध्ये सदर गावातील 80 ते 85 महिला एकल असल्याचे आढळून आले. त्यांना विविध प्रकारच्या समस्या आढळून आल्या. त्या समस्या संस्थेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. सदर सर्व्हेक्षण संस्थेच्या कार्यकर्त्या सौ. सागर मेश्राम यांनी संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या मार्गदर्शनात सर्व्हेक्षण केले.

अध्यक्ष / सचिव
अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली
ता.जि.गडचिरोली